Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**November-2018 Special Issue – LXXIII**

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 500/-

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon [M.S.]
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul [M.S.]
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik [M.S.]
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon [M.S.]
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar [M.S.]
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda [M.S.]

**Advisory Board -**
- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 : UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

# INDEX


| Sr. No. | Title of The Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| | **English Section** | |
| 1 | Mixing-Vixing : Code Switching in Indian English Film Magazines **Mr. Tejesh Beldar** | 08 |
| 2 | Beach Dune Morphology Study of Bordi Village in Maharashtra **Dr. Sunil Kelkar & Dr. M.R. Vaishampayan** | 13 |
| 3 | Cloud Computing: Useful Tools for Library and Information Centers **Mr. Hitesh Brijwasi & Mr. Ishwar Rane** | 19 |
| 4 | Content Analysis : An overview **Dr. Chandramani Gajbhiye** | 23 |
| 5 | Available Water Resources and Water Crisis in Maharashtra State **Dr. Jaywant Bhadane** | 30 |
| 6 | Evaluation of Road Density in Akola District of Maharashtra State **Dr. Sawan Deshmukh** | 34 |
| 7 | E-Way Bill: How Much Supportive for India's Logistics Industry? **Dr. Ravi Vyas & Dr. Suhas Dhande** | 38 |
| 8 | Planning for Government Health Service Centres in Dhadgaon Tahsil of Nandurbar District (M.S.) **Dr. Sandip Garud** | 43 |
| 9 | Information System **Prof. Bhagvan Gavit** | 50 |
| 10 | Indian Women Writers: A Feminist Contribution to Indian English Literature **Miss Manisha Warad** | 55 |
| 11 | On Reading *Brave New World in A Brave New World*: Reflections on the Contemporary Relevance of Aldous Huxley's Imagination **Abin Sojan** | 60 |
| 12 | Participation of Villagers in Water Conservation and Jalyukta Shivar Abhiyan in Maharashtra **Dr. Ankush Doke** | 64 |
| 13 | India Pakistan Relation **Dr. G.D. Ghode** | 68 |
| 14 | The Study of The Human Concerns and Human Rights Issues in Indian English Literature **Ramesh Tadavi** | 72 |
| 15 | Elkunchwar's Old Stone Mansion: A Story of Rural Household Affected By Changing Social Scenario **Dr. Sawan Dharmpuriwar** | 77 |
| 16 | A Study of Emotional Stability among Higher Secondary Students **Dr. Rahul Barve** | 81 |
| 17 | Emotional Intelligence and Frustration among the Third Year of B.A., B.Sc. College Students **Dr. Gokul Chaudhari & Mr. Shivaji Pawara** | 85 |
| 18 | Mainstreaming Gender in Sustainable Peace : Role of United Nations **Dr. Satinder Kaur** | 90 |
| 19 | Levels of Literacy Structure in Chandrapur District (M. S.) **Dr. Godawari Gaurkar, Dr. Satish There** | 102 |
| 20 | Role of Rural Tourism For Economic and Regional Development **Prof. Hanumant Shinde** | 110 |
| 21 | Climate Change and Agro Ecosystems: Key Issues **Mrs. Shashikant Bichkunde** | 114 |
| 22 | Public Participation Plan : Municipal Solid Waste Management in Bilaspur City **Dr.Manoj Kumar Sinha & Dr. Narendranath Guria** | 118 |
| 23 | Leadership Effects on Student Learning Mediated by Teacher Emotions **Dr. Sumeet Khurana & Smt. Shweta Jain Pancholia** | 125 |
| 24 | Potraja : A Victim of Caste Based Rituals and Traditions **Vaishali Aher** | 130 |
| 25 | Women Entrepreneurship Management and Development in India **Dr. Shivaji Thore** | 135 |
| 26 | Study of Migration Pattern of Street Vendors in Pimpri-Chinchwad Area, Maharashtra State. India **Dr. Ravindra Shinde. Mrs. Meena & Dr. Shivaii Pacharane** | 139 |


Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018


| | | |
|---|---|---|
| 27 | Role of Lonely Mothers in the Works of Jhumpalahiri — Asst. Prof. Sanober Kahkeshan | 145 |
| 28 | Institutional Repositories Across the World: A Case Study of Open DOAR (JISC) — Mr. Nikhil Patil & Dr. Chandrashekhar Wani | 151 |
| 29 | Spatial Distribution and Growth of Tribal Population in Chopda, Yawal and Raver Tehsils — Kishor Nehete | 158 |
| | [illegible] | |
| 30 | श्रीमद्‌भगवद्गीता की अद्वैतपरक भाष्य- एक शोधपरक दृष्टी — निशा | 164 |
| 31 | 'अक्षयवट': वर्तमान महानगरो का मंच — डॉ.सन्मुख मुच्छटे | 170 |
| 32 | मोहन राकेश के साहित्य में मनोविज्ञान : एक अध्ययन — प्रा. सूर्यकांत आमलपुरे | 173 |
| 33 | हिंदी सिनेमा और हाशिए का समाज — डॉ.राजश्री तावरे | 176 |
| 34 | समान शीर्षकवाली कृतियो का परिचय — सचिन कुमावत | 179 |
| 35 | जनसंचार के माध्यमो में प्रयुक्त हिंदी — डॉ. भीमराव मानकरे | 183 |
| 36 | रघुवीर सहाय का गद्य साहित्य — डॉ. प्रमोद पडवळ | 186 |
| 37 | हिंदी व्यंग्य परंपरा में शंकर पुणतांबेकर का योगदान — डॉ. बळीराम राख | 192 |
| 38 | भूमंडलीकरण युग में अनुवाद की आवश्यकता — प्रा. विवेकानंद चव्हाण | 195 |
| 39 | मध्यप्रदेश में औद्योगिक निवेश की संभावनाएँ – एक अध्ययन — प्रो. डॉ. सुहास धांडे | 199 |
| 40 | उत्तर छायावाद के उपेक्षित कवि श्री रामगोपाल शर्मा 'रुद्र' की काव्य रचना के विविध आयाम : एक अध्ययन — डॉ. विजयप्रकाश शर्मा | 206 |
| 41 | भारतीय भाषा परिवार और हिंदी — डॉ.अर्जुन पवार | 213 |
| 42 | आदिवासी संस्कृती — डॉ. प्रवीण कांबळे | 218 |
| 43 | भारत के अन्य भाषओ में लिपि देवनागरी की आवश्यकता — डॉ. विलास कांबळे | 220 |
| 44 | बाजारवाद और हिंदी — डॉ.संगीता जगताप | 225 |
| 45 | रघुवीर सहाय की कविता में लोकतंत्र — अक्षय भोसले | 228 |
| 46 | नागार्जुन की कविता 'प्रेत का बयान': भाषिक संरचना — डॉ. गीता दोड्मणी | 232 |
| 47 | 'उधर के लोग' दलित उपन्यास में स्त्री सशक्तीकरण — डॉ. सुचिता गायकवाड | 238 |
| 48 | डॉ. गिरीराज शरण अग्रवाल कि गजलों में सामाजिक चिंतन — डॉ. अमोल दंडवते | 244 |
| 49 | अंतरराष्ट्रीय दार्शनिक, भारतीय साहित्यिक एवं समर्पित समाजसेवी श्रीमान प्रताप सेठजी — डॉ. शशिकांत सोनवणे | 249 |
| 50 | महिला रचानाकारों कि कहानियों में जीवन मूल्य — डॉ. संतोष आडे | 257 |
| 51 | लोकगीत और बंजारा समाज — डॉ.एम. के.राऊत | 264 |
| | [illegible] | |
| 52 | संजय पवार यांच्या एकांकिका :एक दृष्टीक्षेप — डॉ. माणिक बागले | 266 |
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वराज्य — आबासाहेब कसबे | 272 |
| 54 | डेमोफून :मानवी मूल्य संवर्धन व संगोपानार्थ लढणारा मुशाफर — प्रा.अरविंद बा.पाटील | 277 |
| 55 | 'अरे संसार संसार' या महानगरीय कादंबरीतील मध्यमवर्गीय संवेदना — डॉ. वाल्मिक आढावे | 282 |
| 56 | प्रकाश संत एक अष्टपैलू व्यक्तिमत्व — डॉ. उज्ज्वला देवरे व प्रा.सुनील खैरनार | 287 |
| 57 | अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील आंबेडकरवादी जाणीवा — डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 297 |


Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 58 | मारुती चितमपल्ली यांच्या 'चकवाचांदण' आत्मचरित्रातील वनवैविध्य | प्रा. सचिन पाटील | 301 |
| 59 | लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य:एक अनुबंध | डॉ.अनिल गर्जे | 304 |
| 60 | भारतीय लोकशाहीची पायाभरणी आणि ब्रिटीशकालीन कायदे-एक अभ्यास | डॉ.संभाजी पाटील | 309 |
| 61 | पंचवार्षिक योजनेमध्ये गृहनिर्माण धोरण | प्रा. नरेश इंगळे | 314 |
| 62 | जनाबाईचे अभंग:एक अभ्यास | डॉ.प्रवीण कारंजकर | 319 |
| 63 | केशवसुत संप्रदायाची कविता | डॉ.भूषण बंड | 323 |
| 64 | विनोबा – जमनालाल बजाज संबंध | डॉ.दीपक लोणकर | 328 |
| 65 | उत्तम कांबळे यांच्या साहित्याच्या प्रेरणा | प्रा.माधव सूर्यवंशी | 332 |
| 66 | बचत गट आणि महिला सक्षमीकरण | प्रा.श्री.चंद्रकांत मोरे | 336 |
| 67 | सरदार कदमबांडे घराण्याचा संक्षिप्त परिचय | डॉ.शिवाजी वाघमोडे | 339 |
| 68 | आंतरराष्ट्रीय राजकारणावरील अशासकीय संघटनांचा वाढता प्रभाव : राष्ट्रासाठीचे आव्हान | डॉ. दिलीपसिंह निकुंभ | 343 |
| 69 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील सामाजिक,सांस्कृतिक व राष्ट्रीय विचार | प्रा.एस.आर.बैरनार | 351 |
| 70 | भारतीय संविधानाचे शिल्पकार : डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.विनय वाघ व डॉ.सुरेंद्र मोरे | 355 |
| 71 | पुनर्विचार : काही प्रश्नांचा धांडोळा | प्रा. लालबा दुमटकर | 361 |
| 72 | नव्वदोत्तर विदर्भातील शेतकरी चळवळीच्या नेतृत्वाचे समीक्षात्मक अध्ययन | प्रा.राजू लिपटे | 364 |
| 73 | भंडारा जिल्ह्यातील तापमानातील बदलाचा पर्यावरणीय अभ्यास | प्रा.श्रावण कापगते | 367 |
| 74 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री नायिकांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.शरद गायकवाड | 373 |
| 75 | प्रवरेचा भगीरथ पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील | डॉ. चंद्रकांत रुद्राक्षे | 377 |
| 76 | तणाव : मनातील द्वंद्वाचा अविष्कार | डॉ. मनीषा मुलकलवार व डॉ. प्रमोद मुलकलवार | 382 |
| 77 | भारतीय लोकशाही : पंचायतराज | डॉ.एन.बी.आघाव | 386 |
| 78 | राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री संरक्षणासाठी केलेले कायदे | डॉ. डी.एम. चौधरी | 390 |
| 79 | भारतीय लोकशाही प्रणाली आणि प्रांतवाद | डॉ. अरुण शेळके | 394 |
| 80 | तापलेले दिवस : आत्मशोधातून आलेली कविता | प्रा. हेमंतकुमार बागडे | 400 |
| 81 | आदिवासींचे वीर | डॉ. अंजली मस्करेन्हस | 404 |
| 82 | ई-ग्रंथालय बी. एड् प्रशिक्षणार्थ्यांसाठी अद्यावत शिक्षण व प्रशिक्षण घेण्यासाठी प्रभावी उपाय | प्रा. डॉ.दादासाहेब पवार | 409 |
| 83 | रामनाथ चव्हाण यांची कादंबरी 'निळी पहाट' | प्रा. गौतम बनसोडे | 412 |
| 84 | अश्वघोषाच्या साहित्यातील बौद्ध तत्त्वज्ञान | श्रीमती बकुल कांबळे | 418 |
| 85 | जागतिकीकरणाच्या प्रभावातील १९९० नंतरची मराठी कादंबरी | प्रा. प्राची जोशी | 426 |
| 86 | अण्णाभाऊंच्या साहित्यातील सामाजिक विचार | डॉ. प्रल्हाद होंडे | 435 |
| 87 | भारतीय राज्यघटनेचा सरनामा : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 438 |
| 88 | नव्वदोत्तर कथालेखकांच्या कथांतील आशयसूत्रे | डॉ. सहदेव चव्हाण | 445 |
| 89 | औरंगाबाद जिल्ह्यातील जलप्रणाली | डॉ. तुकाराम गजर | 450 |
| 90 | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष्याच्या विस्ताराची व्यूह रचना | प्रा. प्रदीप जगताप | 453 |


Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018


| | | | |
|---|---|---|---|
| 91 | उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेविषयी येणाऱ्या अडचणी व उपाय | नासीर गिरासे | 462 |
| 92 | मौखिक इतिहास | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | 465 |
| 93 | आदिवासी कोकणा भाषेचा एक शोध | प्रा. जयश्री रामदास बागुल (खरे) | 472 |
| 94 | सावरकरांचा राष्ट्रवाद | प्रा. संतोष शेलार | 477 |
| 95 | बाबुराव बागुलांच्या कवितेतील विविध जाणीवा | डॉ.देविदास खोडेवाड | 489 |
| 96 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनातून अभिव्यक्त होणारा स्त्रीविषयक दृष्टीकोन | डॉ.दादाराव गुंडरे | 495 |
| 97 | प्रशासकीय सुधारणा आणि तंत्र | प्रा.हनमंत हेळबे | 500 |
| 98 | शौचालय व सामाजिक परिवर्तन | प्रा.आर. बी.काळे | 504 |
| 99 | नांदेड जिल्ह्यातील शेतीवर आधारित उद्योगधंदे : एक भौगोलिक अभ्यास | डॉ.यु.एस.कानवटे | 508 |
| 100 | आपत्ती व्यवस्थापन व प्रसार माध्यमे | डॉ. बालासाहेब मुंडे | 512 |
| 101 | दलित कवितेतील आई | प्रा.विलास पंडित | 516 |
| 102 | राजकारण व महिलांचे सक्षमीकरण – एक अभ्यास | विनोद डौले | 520 |
| 103 | जतन व संरक्षण : इफला (IFLA) चे योगदान | श्री.नारायण फड | 524 |
| 104 | बारोमास-होरपळून निघणाऱ्या कृषिकेंद्रित जीवनाची करूण गाथा | डॉ.शकुंतला मारंबे | 529 |
| 105 | बखरकारांनी रेखाटलेली संभाजी राजांची अनैतिहासिक प्रतिमा | डॉ.डी.एस.बिराजदार | 533 |
| 106 | अमळनेर येथील प्रताप हायस्कूल मधील शिक्षक व विद्यार्थी यांचा भारतीय स्वतंत्र आंदोलनातील सहभागाचा इतिहास-एक अभ्यास | प्रा.किशोर पाटील | 537 |
| 107 | १९९० नंतरच्या प्रसिद्ध लेखकांच्या पत्नीचे आत्मचरित्रे | डॉ.एस.पी.पैकेकरी | 540 |
| 108 | संत कवयित्रिंचे वाङ्मयीन कार्य | डॉ. सदाशिव सरकटे | 544 |
| 109 | वाचनसंस्कृती – दिशा आणि दशा | डॉ. प्रतापराव गायकवाड | 548 |
| 110 | वृद्धांच्या समस्या – एक समाजशास्त्रीय चिंतन | प्रा. प्रदीप पाटील | 554 |
| 111 | मुस्लीम सत्यशोधक समाजाची वाटचाल (१९६६ ते आजपर्यंत) | प्रा. श्रीचंद चव्हाण | 558 |
| 112 | संत साहित्यमूल्यांचे समकालीन महत्त्व | प्रा. डॉ. धनराज ल. खानोरकर | 561 |
| 113 | क्रांतिनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर : काही निरीक्षणे | डॉ. सुरेश खोब्रागडे | 567 |
| 114 | नव्वदोत्तर समाज जीवन आणि स्थित्यंतरे | - डॉ. किशोर सोनवणे व दिनानाथ पाठक | 573 |
| 115 | निसर्गाचे लीळाचरित्र लिहिणारी ललित प्रतिभा- मारुती चितमपल्ली | प्रा. सचिन पाटील | 578 |
| 116 | परिवर्तनाच्या लढ्याला गतिमान आणि सशक्त बनविणारे विवेकी चिंतन ! | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 581 |
| 117 | नाशिक जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह चळवळ | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | 588 |
| 118 | महाराष्ट्रातील जायकवाडी सिंचन प्रकल्पाचा इतिहास : एक अभ्यास | प्रा. प्रवीण चव्हाण | 594 |
| 119 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | डॉ. महादेव मुंडे | 598 |
| 120 | शोषण करणाऱ्या नव्या व्यवस्थेचा शोध घेणारी अरुण काळे यांची कविता : 'नंतर आलेले लोक' | डॉ. शशिकांत पाटील | 602 |
| 121 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप आणि जनमानस | प्रा. राजाराम झोडगे | 607 |
| 122 | मानसिक तणावात नाडीशुद्ध प्राणायामाचा परिणाम | कुणाल महाजन | 612 |
| 123 | सामाजिक पर्यावरण : काही निरीक्षणे | प्रा.अंबादास घुले | 616 |


Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 124 | साहित्य रत्न छत्रपती संभाजी महाराज | डॉ.राजराम सोनवणे | 619 |
| 125 | गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्य केंद्राचे भौगोलिक अध्ययन | कु.सोनाली के.वाघ | 625 |
| 126 | अमरावती व नागपूर येथून प्रकाशित वृत्तपत्रातील जाहिरात दरांच्या निर्धारणाचे विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. दर्शना चौधरी | 637 |
| 127 | तुकाराम शिष्या संत बहिणाबाई | डॉ. भूषण बंड | 644 |
| 128 | शोषण करणाऱ्या नव्या व्यवस्थेचा शोध घेणारी कविता : 'नंतर आलेले लोक'- अरुण काळे | डॉ. शशिकांत पाटील | 647 |
| 129 | अशोक डोरले यांची कविता : 'फिर्यादी' | डॉ. मारुती घुगे | 652 |
| 130 | भारतातील जातीव्यवस्था आणि जाती निर्मुलनविषयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार | डॉ. पद्माकर दागेंडे | 656 |
| 131 | 'बारोमास' : होरपळून निघणाऱ्या कृषिकेंद्रित जीवनाची करूण गाथा | डॉ. शंकुतला मारंबे | 661 |
| 132 | ग्रामीण तरुणाच्या जीवनसंघर्षाची कहाणी : फेसाटी | डॉ. भाऊसाहेब गमे | 665 |
| 133 | जालना जिल्ह्यातील सुतगिरणी उद्योग : एक भौगोलिक अध्ययन | डॉ. व्ही. एल.राजाळे | 669 |
| | [illegible] | | |
| 134 | भारतीय लोकरंगभूमी आनी कोंकणी लोकनाट्य 'रणमाले' : एक चिकित्सक मोलावणी | डॉ. हनुमंत चोपडेकार | 672 |
| 135 | र.वि.पंडिताल्या काव्यात चित्रित मोगाची विविध रुपां : एक चिकित्सक नियाळ | प्रा. सत्यवान नायक | 681 |
| 136 | सावूलगोरींतले वेळूस्कारी शब्दाविश्कार | डॉ. राजय पवार | 692 |
| | [illegible] | | |
| 137 | عصر حاضر اور غزل کے جدید رجحانات | Prof.Dr.Md.Iqbal Jaweed | 704 |


[illegible]
(Originality of the papers) [illegible]

Scanned with CamScanner

# प्रकाश संत एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

मार्गदर्शक :
डॉ. उज्ज्वला देवरे
संशोधक विद्यार्थी :
प्रा. सुनिल खैरनार
एस.एन.डी. कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय येवला

**प्रस्तावना :–**

प्रकाश नारायण संत यांचा जन्म प्रसिध्द लघुनिंबधकार ना. मा. संत व कवयत्री इंदिरा संत यांच्या कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांना वाङ्मयीन वारसा लाभलेला असून त्यांचे मन वाङ्मयीन दृष्टया संस्कारक्षम झालेले दिसून येते. बालपण आनंदातच जात असतांना त्यांचे आई वडील त्यांना आईच्या आजोळी दत्तक म्हणून देतात व त्यांचे नाव भालचंद्र गोपाळ दीक्षित असे होते. बालपणीचे त्यांचे शिक्षण आजोळी झालेले आहे. असे बालपण आनंदात जात असतांनाच अकस्मात त्यांच्या वडिलांचे निधन होते. कुटुंबात प्रकाश संत मोठे असल्याकारणाने छोटी भावंडे आणि आई या सर्वांची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडते. कवयत्री इंदिरा संत यांनी मुलांच्या मनावर शील, चारित्र्य, शिक्षण यांचे संस्कार रूजविले. कुटुंब व नोकरी सांभाळून मुलांना स्वयंपूर्ण बनवून त्यांना त्यांच्या पायावर उभे करून एक आदर्श नागरीक बनविले. बालपणापासूनच प्रकाश संतांनी आपल्या अंगी असलेल्या कला गुणांना वाव देऊन त्यांचा विकास करून प्रत्येक कलेच्या क्षेत्रात त्यांनी ठसा आपल्या कर्तृत्वाने उमटविलेला दिसून येतो. प्रकाश संतांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना हेरून कवयत्री इंदिरा संत यांनी त्यांच्या विकासाला चालना दिलेली दिसून येते. प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत व भांवडांचा संभाळ करीत प्रकाश संतांनी आपले शालेय शिक्षण यशस्वी रित्या पूर्ण केलेले दिसून येते. अशा या प्रतिभाशाली व्यक्तिमत्वाच्या अष्टपैलू गुणांचे वर्णन पुढिल प्रमाणे करता येइल.

**प्रकाश संतांच्या अंगी असलेली खेळकर वृत्ती :–**

प्रकाश संत यांचे बालपण त्यांच्या मित्रांन सोबत अतिशय आनंदी व खेळकर वृत्तीतून झालेले दिसून येते. त्यांच्या 'वनवास' या कथासंग्रहातील 'खेळ' या कथेत गावा बाहेरील असलेल्या 'लक्ष्मी' ची उंच असलेली झाडे या ठिकाणी लंपनचे मित्र जंब्या कटकोळ, डीशी, परळया, कणब्या या सर्वांच्या या झाडावर बसण्याच्या असलेल्या जागा मात्र ठरलेल्या असत. याच झाडांन जवळ असलेल्या शेतातील पाण्यातील खड्डयांनमध्ये खेकडयांन बरोबर खेळत असलेला 'गामा पैलवानाचा' खेळ जो मुलगा शक्तिमान खेकडयाचा शोध लावेल त्या खेकडयाला त्या पोराच्या नावानं ते ओळखले जायचे. 'लंप्याचा गामा पैलवान' त्या खेकडयाने दोरीला बांधलेल्या कांदयाला पकडल्यास मुले ओरडायची "लंप्याचा गामा पैलवान कांदा पकडला."[१] अशा खेकडयांच्या खेळात ही मुले दंग होवून जात असे.

याच लक्ष्मीच्या झाडांवर लंपन आणि त्याचे मित्र 'टारझन' चा खेळ खेळत असे. सगळयात शक्तिवान टारझन कोण यासाठी त्यांच्या मित्रांन मध्ये मारामारी होत असे. याच झाडाच्या फांदिला दोर बांधून एका झाडाच्या फांदिवरून दुसऱ्या झाडाच्या फांदिवर टारझन सारख्या त्यांच्या उडया मारणे टारझनच्या खेळाचा आनंद लुटणे. टारझन सारखा चड्डीच्या पट्टयाला सुरा लावून फिरणे. टारझनचा सिनेमा पहाण्यासाठी गावातील थेटरमध्ये जावून सिनेमा पहाणे अशा खेळाच्या गंमती लंपन आणि त्याचे मित्र करीत असे.



Scanned with CamScanner

लंपन आणि त्याच्या मित्रांचा आवडता खेळ म्हणजे क्रिकेट त्यांच्या क्रिकेटच्या टिमचा कॅप्टन एशी असून तो खेळा बरोबरच मारामारी करण्यामध्ये आघाडीवर असे. मॅचच्या हंपायरचे काम गुंडच्या गुंड जंब्या कटकोळ करीत असे. गुरूवार पेठेतील मुलांच्या टीमशी लंपनच्या टीमची मॅच सुरू असतांना हंपायर म्हणून जंब्या कटकोळ करीत असतांना त्यांने दिलेल्या निर्णयावर लंपन आणि त्याचे मित्र त्याला "पार्सलेटी हंपायर, पार्सलेटी हंपायर!"[२] असे त्याला चिडवतात व त्याच्या नावाचे भजन सुरू करतात. यावरून जंब्याने लंपन आणि त्याचा मित्र के. पांडुरंग यांना मारलेल्या थपडा अशा खेळाच्या अनेक आठवणी सांगितलेल्या आहेत.

'पंखा' या कथेत सावकार आणि त्याची गँग लिंबू फेकण्याचा खेळ खेळत असतांना लंपन व त्याचे मित्र त्या खेळात सहभागी होत असे. सोंडऱ्या मोठयाने कानडीत ओरडून सांगत असे. "हुडगुरेऽऽ! लिंबू तलिगे बिलुंदे बुगटे बरतिदे नोडरी! व्हडतिनि... ए. हुडगुरे ऽऽऽ लिंबू... "[3] सावकार व त्याच्या गँगला खेळण्यासाठी रस्ता मोकळा करण्याचे काम लंपन व त्याचे मित्र करीत असे. जणू ही मुले त्यांच्या गँगचं शेपूटच असल्या सारखे वाटत असे.

'परचक्र' या कथेत लंपनच्या घरी पाहूणा म्हणून आलेला बंक्या लंपन बरोबर शाळेत आल्या नंतर लंपनच्या शाळेतील मित्र कणब्या, गंग्या, परळया, सोंडऱ्या हे विटीदांडूचा खेळ खेळत असतात. तो खेळ मंत्र म्हणून कसा खेळायचा याची नवीन माहिती देतो. "पाऽऽ व चिट्टीमिट्टी घोऽऽडा फूऽऽक डोळाझिला! एऽऽक दोनतिन चारपाच साऽ हा साऽऽत साऽऽत आठनौधा! प्रत्येक 'पा' व 'झि' वर जोर दयायचा."[४] असा मंत्राचा जप केल्यास आपल्या इच्छा पूर्ण होतात. परीक्षेत अभ्यास न करताही पास होता येतं. असा विटीदांडू खेळाचा बंक्या नवीन मंत्र सांगतो. गोटया खेळायची देखील नवीन पध्दत लंपन आणि त्याच्या मित्रांना बंक्या शिकवतो.

'रानी का बाग' या कथेत लंपनच्या गावात खेळाची अनेक मैदाने असून या मैदानांना वेगवेगळी नावे दिलेली आहेत. त्यामध्ये 'नागझरी ग्राउंड', 'लेले ग्राउंड', 'ड्रिलचं ग्राउंड', 'टेशन ग्राउंड' इ. अशी अनेक ग्राउंड आहेत. या ग्राउंड वर लंपन आणि त्याचे मित्र क्रिकेटची मॅच खेळत असे. त्यात अळण्या, चिन्या कामत, चंब्या कुलकर्णी, गुरूपादप्पा वज्रमट्टी हे मित्र खेळ सुरू असतांना टाळया व 'की जय' किंवा 'की घुडक' च भजन किंवा 'बोंबला!" असे म्हणून मुलांची थट्टा करीत असे व खेळण्याचा आनंद घेत होते.

'घसरगुंडी' या कथेत मुलांचे आवडते खेळ घरांच्या अंगणात किंवा घरासमोरच्या रस्त्यावर चोरशिपाई, कुरघोडी, लिंगवट्टल, काजूवट्टल आणि रस्त्यावरचं क्रिकेट या सर्व खेळातील मुलांचा डोकी फिरवणारा खेळ म्हणजे 'काजूवट्टल' हा खेळ दिसायला एकदम साधा पण खेळतांना फटाक्याची माळ लावल्यासारखा दणदणीत. "वट्टलनं काजूबिया उडवणं म्हणजे फटाक्याची वात उदबत्तीनं पेटवण्यासारखंच नाकात सुंदर वास आणि शिवाय सगळीकडं शांत शांत पण एकदा वात पेटल्यावर? मग? आधी सुर्रर्र... आणि नंतर फटाकेसाहेबांचा दंगा असणार की नाही? तसंच हे वट्टलनं काजूबिया उडाल्या की मग पोरांचा दंगा. प्रत्येक पोरगा म्हणजे एक स्वतंत्र फटाकाच शिवाय आणि त्या सगळयांची मिळून एक माळ." असा दंगा करणारा लंपन व त्यांच्या मित्रांचा आवडता खेळ.

लंपन आणि त्याचे मित्र ज्या ग्राउंडवर खेळत होते त्याच ठिकाणी मजुरांनी खड्डा खोदून एक सुंदर घसरगुंडी तयार केली. लंपन आणि त्याचे मित्र या घसरगुंडी वरून घसरत असतांना चांदोबा खाली आल्यासारखा वाटत होता. जणूतो लंपनला भेटण्यासाठी खाली येत आहे. त्या घसरगुंडीवरून घसरत असतांना "चांदोबाकडं बघत. तो वर गेलेला. मी पुन्हा वर, की तो खाली. मग पुन्हा वर मी किती वेळा घसरलो, माहीत नाही."[५] असा घसरगुंडीच्या खेळाचा अस्वाद लंपन आणि त्याचे मित्र घेत होते.


Scanned with CamScanner

'कुलूप' या कथेत गुंडीमठ रोडच्या जवळ एक इमारत असून त्या इमारतीची दोन्ही फाटक तुटलेले असून लंपन व त्याचे मित्र त्या फाटकाची उचलून यात्रा काढत असे. ती फाटक जणू त्या इमारतीचे पंखच वाटत होते. सुरूवातीला यात्रेत फक्त चाळीतील मुले असायची फाटक उचलताना मुले 'फाटक महाराज की जय! चला उचला, चला!'[6] असं म्हणत ती यात्रा सुरू व्हायची शेवटी ही यात्रा गुंडीमठ रोडवर जावून परत येत असे. कोणीतरी मुलगा म्हणार "ओम यात्रा समाप्तम् फाटक महाराज की जय!"[7] मुले ते फाटक त्याच ठिकाणी खाली टाकणार त्याचा मोठा आवाज येवून ते फाटक गतप्राण झाल्यासारखं खाली पडून राहायचं असा खेळाचा आनंद ही मुले घेत होती.

'ज्यामीन' या कथेत गल्लीतील मुले 'ज्यामीन कोण?' चा खेळ खेळत असतात. या खेळात एक पोरगा विचारणार "ज्याऽ मिन् कोण?, 'मी' सगळी पोरं खच्चून ओरडणार. 'ज्यामिनची बायको कोण?', तो पुन्हा विचारणार. एकमेकाकडं बोटं दाखवून सगळी पोरं ओरडणार 'हा'; 'ज्यामीन गेला पळून, बायकोला आणा धरून."[8] असा प्रश्न विचारणारा पोरगा आपल्या हातातील आंब्याची कोय ज्यामिनच्या बायकोच्या अंगावर फेकून मारणार तो कोयीचा मार चुकवण्यासाठी सगळयांची इकडं तिकडं पळापळ होणार नेम बरोबर बसल्यास कोयीचा सणसणीत मार बसणार नेम चुकल्यास ती कोय इतरत्र जावून पडणार परत एखादा मुलगा कोय उचलून ओरडणार 'ज्याऽमिन कोण?' असा मुलांचा दंगा करणार खेळ सुरू होत असे.

**प्रकाश संतांना गायणाची व संगीताची असलेली आवड :–**

प्रकाश संत यांना बालपणापासूनच गायणाची व संगीताची आवड असलेली दिसून येते. त्यांच्या आईने त्याच्यां अंगी असलेल्या या कलेचा विकास व्हावा म्हणून त्यांना वाजवण्यासाठी सतार घेऊन दिलेली होती. प्रकाश संत यांच्या 'वनवास' या कथा संग्रहात लंपन शाळेत जात असतांना त्यांची शाळेची सहल असरग्याच्या महादेवाला गेली असता. रस्त्याने जात असतांना शाळेतील मास्तर व त्याच्या मैत्रीणी त्याला गाणे म्हणण्यासाठी आग्रह करतात. त्यावेळी लंपन

"गगनि उगवला सायंतारा
मंद सुशीतल वाहत वारा
हाक तुझी मज स्पष्ट ऐकू ये,
येइ सखे ये बैस जवळिये."[9]

शाळेतील मास्तर हे गीत सायंकाळचे आहे असा आक्षेप घेतात. त्या नंतर लंपन रूबाबदार फौजेचं, 'गर्जा जयजयकार क्रांतिचा' हे गाणं म्हणतो शेवटी लंपनची मैत्रीण सुमी हिचे आवडते गाणे म्हणतो.

"रानात सांग कानात आपुले नाते
मी भल्या पहाटे येते
पाण्यात निळया, गाण्यात
भावना हलते
हळु हळु कमलिनी फुलते
त्या तिथे तुला सांगते..."[10]

अशा सुंदर गीतांच्या चालीवर लंपन आणि त्यांच्या मित्रांची शाळेची सहल अविस्मरणीय होते.

प्रकाश संत यांच्या 'शर्यत' या कथेत लंपनचे आज्जी व आजोबा गावाला गेले असता लंपनच्या घरी सुमी आणि तिच्या मैत्रीणी खेळ खेळण्यासाठी येतात. त्यांचा पत्ते खेळण्याचा डाव सुरू होतो. त्या डावामध्ये



Scanned with CamScanner

सुमी आणि लंपन यांची जोडी जमल्या नंतर सुमी आणि लंपन पत्त्याच्या खेळात जिंकत जातात व आनंदाच्या भरात गाणे म्हणतात.

"सावळाच रंग तुझा
पावसाळी नभापरी
आणि नजरेत तुझ्या
वीज खेळते नाचरी...
सावळाच रंग तुझा
करी जिवाला बेचैन..."[११]

गाण्यांच्या अशा डोहात जणू ते डुंबून वहात जात आहेत असा अभास त्यांच्या खेळातून आपल्याला होत आहेत.

'परचक्र' या कथेत लंपनच्या घरी पाहुणे आलेले आहेत त्यात बंक्या, हिरा, सोना, करसुंदरीकर अण्णा व मामी हे त्यांच्या घरी आल्या नंतर वेगवेगळी संकटे लंपन व त्याचे आज्जी आजोबा यांच्या समोर उभी रहातात. लंपनच्या शाळेत गाण्यांच्या स्पर्धा असतात त्यात तो सहभाग नोंदवतो त्या स्पर्धेत सर्वच मुले मुली छान गाणे म्हणतात. लंपन, त्याचे आवडते पुढिल गाणे म्हणतो.

"... जलदेवींनो नकाच थांबू
पाताळाप्रति लगबग धावा
जागे करूनी त्या रोषाला
सांगा भारत स्वतंत्र झाला...
वाऱ्यानों जा दाहि दिशांना
गिरिकुहरीं संदेश पोचवा
पत्थरांतुनी घुमवा बोला
भारत माझा स्वतंत्र झाला..."[१२]

लंपनच्या या गीताला 'अ' गटात पहिलं चांदिच्या पेल्याचं बक्षिस मिळते. बक्षिसे वितरणाच कार्यक्रम संपल्या नंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे त्याला ऑफिस मध्ये बोलावून घेवून खिशातील एक पॉकेट हातात देवून म्हणतात.

"छान म्हणालास बाळ तू गाणं आवाज गोड आहे. तुझा हे पाकीट घे इथं शारदा संगीत विद्यालयाचे म्हापसेकर मास्तर आहेत ना, त्यांना हे पाकीट नेऊन दे ते तुला माझ्या वतीनं बक्षीस देतील."[१३] अशा या बक्षिसाच्या प्रेरणेतून व गौरवातून प्रकाश संत यांच्या गायनाची आवड पुढे पुढे विकसीत होत गेली.

'शारदा संगीत' या कथेत पाहुण्यांनी दिलेलं ते पाकीट लंपन 'शारदा संगीत' विद्यालयाचे म्हापसेकर मास्तरांना नेवून दाखवतो. त्यावेळी म्हापसेकर मास्तर त्याला सांगतात. "तू काल ज्यांच पत्र घेऊन आला होतास ते माझ्या गुरूचे भाऊ त्यांची आज्ञा आहे. तू जे म्हणशील ते सगळं मी तुला एक पैसाही न घेता शिकवीन. तुला काय शिकायचं आहे?"[१४] लंपनला गाणं शिकायचं असतांना समोरच्या संगीताच्या पेटया पाहून तो संगीत शिकण्याची इच्छा व्यक्त करतो. तेव्हां पासून लंपनच्या संगीताच्या शिक्षणाचा श्रीगणेशा सुरू होतो. म्हापसेकर मास्तर लंपनला भूप, दुर्गा, मालंकस, यमन असे संगीताचे सर्व राग शिकवतात. म्हापसेकर मास्तर एक दिवस 'सतार' या वाद्यावरून सहज बोटं फिरवत असतांना त्या तारा वाजवल्या नंतर लंपनला काय वाटलं हे त्याने



Scanned with CamScanner

मास्तरांना सांगितले तेव्हां ते म्हणाले. "तू वरून येतानाच स्वरांची जाण घेऊन आला आहेस."[१५] अशा लंपनच्या संगीताच्या ज्ञाना विषयी म्हापसेकर मास्तर त्याचा गौरव करतात.

संगीताचे ज्ञान घेण्यासाठी जमखंडीकर साहेब 'शारदा संगीत' विद्यालयात येतात तेव्हां म्हापसेकर मास्तर त्यांना संगीत शिकवण्याची जबाबदारी लंपनवर देतात. लंपन त्यांना संगीतातील बारकावे अतिशय सहजपणे शिकवतो. त्यांच्या आग्रहा नंतर लंपन त्यांना 'वद जाऊ कुणाला शरण गं' हे गाणं पेटिवर सर्व तानासकट वाजवून दाखवल्या नंतर जमखंडीकर साहेब त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हणतात. "बाळ, तू एवढासा आहेस, पण तुझ्या बोटांत जादू आहे! तुझं नाव काय असेल ते असो, मी तुला 'गुरू' मानतो."[१६] अशा शब्दात लंपनचा गौरव करतात.

म्हापसेकर मास्तर लंपनला केदार रागातलं कोणतं तरी गाणे वाजवण्यासाठी सांगतात. लंपन त्याच्याच नादात केदार राग वाजवत असतांना मास्तर सर्वांच्या पेटया वाजवण्याचे थांबण्यास सांगतात. लंपनचे वाजवणे घनदाट जंगलातून जातांना वाटते ते एकदम त्या जंगलातून बाहेर आल्यासारखे झाले. पुढिल सर्व मुगवटी वाजवून थांबल्या नंतर त्याचं वाजवणं ऐकत असलेली वसुधा होळेकेरी लंपनला म्हणते. "वा! काय सुंदर वाजवलंस रे! पावसाची सर इकडून तिकडं जावी तशी तुझी बोटं फिरली बघ मघाशी."

"एखादया सुंदर वनातून आपण कुठं तरी चाललो आहोत असं वाटतं केदारचे स्वर ऐकताना."[१७] असे कौतुकाचे उद्‌गार वसुधा लंपनच्या संगीताच्या ज्ञानाचे करते.

'शारदा संगीत' विद्यालयाचा गावातील गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन म्हापसेकर मास्तर दरवर्षी आयोजित करीत असतात. त्या कार्यक्रमात लंपनला म्हापसेकर मास्तरांना मधुकंस वाजवायला सांगितलेल होतं. लंपनने अतिशय ऐटित वाजवायला सुरूवात केली आणि गावातील रेल्वे स्टेशनवरून मालगाडी सुटते. तिच्या त्या कानठळया बसवण्याच्या आवाजात लंपनचं कार्यक्रमातील सर्व वाजवणं मालगाडीच्या त्या मोठया आवाजात बुडून गेलं ऐवढी तयारी करून ऐन वेळी आलेल्या मालगाडीनं सगळा घोटाळा करून टाकला यामूळे लंपन उदास होतो व पडदयाच्या पाठीमागे जावून बसतो. त्याचवेळी मास्तर पाठीमागे येवून त्याला म्हणाले,

"अरे, बाहेर चल. लोकांना तुझं वाजवणं पुन्हां ऐकायचं आहे, म्हणून दंगा सुरू आहे. चल लवकर"
"मी परत स्टेजवर गेलो ते मधुकंसमधलं गाणं मी पुन्हा वाजवलं शेवटी तिय्या घेतल्यावर सगळया पट्ट्यांवरून मी सर्रकन बोट फिरवलं. तेव्हां लोकांनी टाळयाच टाळया वाजवल्या."[१८] असा लंपनच्या संगीताच्या क्षेत्रातील प्रवास उंचावत गेला.

'नाणं' या कथेत गावातील हिंडलगेकर अण्णांचे मोटार दुरूस्तीचे दुकान असून अण्णांना संगीताची आवड असून वेळ मिळेल तेव्हां ते आपला संगीताचा छंद जोपासत असे. त्यांच्याकडे एक जूना हार्मोनियम होता. एक दिवस लंपन अण्णांच्या घराजवळील कट्टयावर बसलेला असतांना लंपनला म्हणतात. "काय बेष्ट वाजिवलात हो हार्मोनियम तुम्ही! त्या कार्यक्रमात हो, तुम्ही इतकं चांगल वाजविता म्हणून माहीत पडायला नव्हतं बगा."[१९] असा गौरव अण्णा लंपनचा करतात. अण्णा लंपनला घरी बोलावून घेतात व सांगतात ती परवा म्हटलेली गाणी परत वाजवून दाखवतो. लंपनच वाजवणं सुरू असतांना अण्णां एकदम डोळे लावून त्याच्या वाजवण्यात दंगून जातात. लंपन घरी जाण्यासाठी निघतो तेव्हां अण्णा त्याला थांबवून म्हणतात. "थांबा जरा मोकळया हातानं जाऊ नका. हे घ्या–" अण्णा पेटीतून कपाटातून एक चकचकीत जड चांदीचं नाणं लंपनच्या खिशात घालतात व म्हणतात. "छान वाजवता तुम्ही मलाही ते असंच एकानं लहानपणी दिलं होतं ते आता मी तुम्हांला दिलो घ्या."[२०] असा त्याच्या कलेचा सम्मान करतात.



Scanned with CamScanner

'झुंबर' या कथेत लंपनच्या शाळेत त्यांना अभ्यास करण्यासाठी गायणाचा तास ठेवलेला आहेत. हा तास लंपनला विशेष करून आवडतो. शाळेतील आचरेकर बाई मुलांना गायण शिकवीतात. लंपनची गायणामध्ये विशेष असलेली आवड पाहून त्याची शाळेतील स्वागतगीत म्हणणाऱ्या 'रत्नहारात' निवड होते. त्यावेळी त्याने हे गीत गायले होते.

**"... खबरदार जर टाच मारूनी**
**येशील पुढे, चिंधडया**
**उडविन राइराइएवढया..."[२१]**

पुढे शाळेत कार्यक्रम असल्यामुळे स्वागतगीताची तयारी लंपन आणि त्यांच्या रत्नहारातील मुले व मुलीच्या गटाची आचरेकर बाईच्या मार्गदर्शनाखाली सुरू असते.

'कुलूप' या कथेत गावातील चाळीत राहणारे हिंडलगेकर अण्णा मोटार दुरूस्तीचे काम करत असे. लंपन आणि त्याचे मित्र त्या ठिकाणी खेळत असतांना हिंडलगेकर अण्णा लंपनला घरी बोलावून घेत असे व लंपनला पेटीवर त्याला येणारी शारदा संगीत विद्यालयात शिकवलेली गाणी वाजवायला सांगत असे. अण्णांचं आवडतं गाणं

"शांत सागरी कशास उठविलीस वादळे..."[२२] हे म्हणण्यासाठी सांगत असे. अण्णांची मुलगी दमयंती हि देखील तिला आवडणारी दोन गाणी

"मनोरथा चल त्या नगरीला..." आणि "मोहूनिया तुजसंगे नयन खेळले जुगार..."[२३] लंपनने गायल्या नंतर दमयंती हसून त्याला प्रतिसाद देत असे. सर्वांची गाणी वाजवल्या नंतर सर्वांत शेवटी मामी त्यांना आवडणारं 'कुलवधू' नाटकातील

**"... मनरमणा मधुसूदना**
**मुखि राहो माझ्या**
**प्रभो हे नाम सदा..."[२४]**

असे अण्णांच्या घरातील मंडळी लंपनच्या गायणाची प्रशंसा करीत असे. अशा प्रकारे प्रकाश संतांची गायणाची व संगीताच्या कलेची दिवसेन दिवस आवड वाढतच गेली.

**प्रकाश संत यांनी केलेले कथा वाङ्मयाचे कलात्मक लेखन –**

प्रकाश संतानी मराठी कथा वाङ्मयाच्या क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य केले आहे. त्यांच्या बालपनात घडलेल्या घटना प्रसांगाच्या आधारे 'लंपन' या पात्राच्या रूपाने आपले बालपण उभे केले आहेत. 'वनवास', 'शारदा संगीत', 'पंखा', 'झुंबर' असे त्यांचे चार प्रसिध्द् कथा संग्रह आहेत. या कथासंग्रहात मधून त्यांनी बालपणी आपल्या आईकडील आज्जी व आजोबांना दत्तक गेल्या नंतर त्यांचे बालपणाचे शिक्षण त्यांच्याकडेच झालेले असून या बालपणातील त्यांच्या मित्रांन बरोबर केलेल्या अनेक गमती.जमती वेगवेगळे खेळलेले खेळ, केलेल्या खोडया, मिळालेल्या शिक्षा, तेथील प्रदेश, घरे यांचे अतिशय प्रभावी पणे लेखन केले आहे. त्यांच्या कथासंग्रांमध्ये अतिशय ओघवती अशी भाषाशैली आलेली असून या कथांचा अस्वाद घेत असतांना वाचक त्या मध्ये रममाण होवून जातो.

'वनवास' या कथासंग्रहात प्रकाश संतांनी 'खेळ', 'मैत्री', 'साखळी', 'शर्यत' या कथांनमधून बालपणात मित्रांन सोबत केलेल्या गमती जमती, खेळांचे वेगवेगळे प्रकार त्यातून मिळविलेला आनंद, मुलांशी झालेले वाद, शाळेतील सहलींचा घेतलेला आनंद, अभ्यासातील प्रगती व अधोगती या सर्व घटना प्रसंगांचे अतिशय



Scanned with CamScanner

कलात्मकतेने लेखन केले आहे. तसेच 'ओझं','फुलाची गोष्ट','अर्थ','आदम' या कथांनमधून आई.बाबा, आजी. आजोबा व वडीलधाऱ्या मंडळींन विषयी असलेली आपुलकी, जिव्हाळा, प्रेम, आदर, विरह या सर्व भावनांचे होणारे आरोह.अवरोह या दोलायमान स्थितीचे अतिशय जिवंत व प्रत्ययकारी चित्रण प्रकाश संतांनी या कथांनमधून साकार केले आहे.

'शारदा संगीत' या कथासंग्रहात 'परचक्र', 'आगगाडीच्या रूळावर', 'रानी का बाग', 'घसरगुंडी', 'शारदा संगीत' या पाच दिर्घ कथांनमधून पाहुणे म्हणून आलेले जवळचे नातेवाइक त्यांच्या वागण्यामुळे झालेला त्रास आगगाडी विषयी असलेले कुतुहल खेळाच्या ग्राऊंडवरीती निर्माण झालेली घसरगुंडी तिचा घेतलेला अस्वाद संगीत शिकायाची धडपड व संगीतात मिळविलेले प्राविण्य या सर्व अनुभवांचे अतिशय वास्तव व प्रत्यकारी चित्रण या कथांनमधून प्रकाश संतांनी केले आहे.

'पंखा' हा प्रकाश संतांचा तिसरा कथासंग्रह असून या कथासंग्रहामध्ये अकरा कथांचा समावेश केलेला आहे. लंपनया पात्राच्या जीवनात आलेल्या वेगवेगळया पात्रांच्या व्यक्तिमत्वाच्या पैलूंचे व त्यांच्या स्वभावांचे चित्रण अतिशय प्रत्ययकारी केले आहे. 'सफाई' या कथेत आजी व आजोबांच्या घरी कामाला असलेल्या बाबुराव या पात्राच्या नादी स्वभावाचे अतिशय विनोदी व गंभीर पणे वर्णन केले आहे. 'डग' या कथेत गावातील दुंडप्पा हत्तरगी या स्वाभिमानी व प्रामाणिक, कष्टकरी टांगेवाल्याच्या स्वभावाचे चित्रण केले आहे. 'पाहुण्या' या कथेत लंपनच्या आईची मैत्रीण निमामावशी हिच्या अभिमानी स्वभावामुळे तिला जीवनाचा भावी जोडीदार निवडतांना झालेल्या चूकीमुळे कसा पश्चाताप करावा लागतो याचे विरह रूपी चित्रण या कथेतून आलेले आहे. 'पंखा' या कथेत लंपनचा मित्र सांवप्रसाद याचा काका सावकार सांवप्रसाद व त्यांच्या आई. वडिलांना घराच्या बाहेर काढून देवून बंगल्याचा तावा घेवून कसे ऐश आरामी जीवन जगतो व याच सावकाराच्या जीवनाची वाताहात होवून रस्त्यावर बसून त्याला पंखा विकावा लागतो अशा धोकेबाज व स्वार्थी सावकाराच्या स्वभावाचे प्रभावी चित्रण केले आहे. 'ग्रंथ' या कथेत लंपनला घरी नेवून आपली पुस्तके वाचण्यासाठी देणारा मन्याशेट हा लंपनला ग्रंथ व मानवी जीवन हे कसे सारखे आहे. या वास्तवाचा अभास दाखवणाऱ्या हेकेखोर व विक्षिप्त स्वभावाच्या मन्याशेटच्या स्वभावाचे प्रभावी चित्रण केले आहे.

'झुंबर' या कथासंग्रहात मानवी मनातील वेगवेगळया इच्छा अकांक्षांची तृप्ती होण्यासाठी माणूस कसा धडपड करीत असतो हे वेगवेगळया पात्रांच्या अनुभवांचे चित्रण या कथासंग्रहातील कथांनमधून आलेले आहे. 'झुंबर' या कथेतील अविवाहित असलेल्या शाळेतील संगीत विषयाच्या आचरेकर बाई 'कुलूप' या कथेतील लंपनच्या गीत गायनामुळे खुदकून हसणारी दमयंती व गीतातील आशयाप्रमाणे मनासारखा मिळालेला पती यामुळे आनंदी असणारी दमयंती.

'ज्यामीन' या कथेत संकट काळात दुसऱ्याला मानवतेच्या भावनेतून तेलसंगी सावकार एकासाठी ज्यामीन झाले आणि त्या प्रकरणात त्यांची पूर्ण वाताहात होवून त्यांना वेड लागून आज गावात बडबड करत फिरणे. 'पायगुण' या कथेत सोन्याबापू जन्मापासूनच अपंग असून तो पूर्ण बरा होणार अशी वेडी आशा बाळगून त्याची सर्व सेवा करणारी वसू मामी व मामा अशी अनेक पात्रे प्रकाश संतांनी त्यांच्या कथांमधुन अतिशय जीवंत पणे साकार केली आहे.

**प्रकाश संतांना असलेली चित्रकलेची आवड –**

प्रकाश संतांना बालपणापासून चित्र काढण्याची आवड असून त्यांनी आपल्या या छंदाला कलेचे रूप देवून अनेक सुंदर चित्र रेखाटलेली आहेत. त्यांना बालपणापासून आठवतं तेव्हां पासून त्यांनी चित्र रंगवण्यातला



Scanned with CamScanner

आनंद घेत आहेत. शाळेत दूसरी किंवा तिसरीत असतांना अरूण वाचन मालेतील चित्र नव्या खडूंनी रंगवलेले त्यांना स्पष्ट पणे आठवत आहेत. बालपणापासून त्यांना निसर्ग चित्र काढण्याचा छंद आहेत. त्यांच्या बालमनावर त्यावेळी दिलीप जामदार यांनी काढलेले जलरंगातील निसर्ग चित्र त्यांच्या मनावर खोल परिणाम करून त्यांना आजही त्या चित्राचे स्मरण होत आहे. त्यांनतर प्रकाश संतांनी प्रत्यक्ष निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन चित्र काढायला सुरूवात केलेली आहेत. हे निसर्ग चित्र काढण्यासाठी प्रकाश संत बेळगाव व त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशात पायी किंवा सायकलवर भटकंती करून चित्र काढत असे. सुट्टीच्या दिवशी मनासारखे निसर्गाचे स्थान निश्चित करण्यासाठी प्रकाश संत तासन तास भटकंती करत असे. मनासारखे निसर्गाचे स्थान निश्चित झाल्या नंतर आधी पेन्सिलीनं चित्र रेखाटून त्यात स्थळाप्रमाणे रंग भरत असे. परंतू चित्र काढून झाल्यावर काही तरी राहून गेल्यासारखं वाटायला लागत असे. प्रकाश संतांनी काढलेतं एक चित्र त्यांना सापाच्या कातीसारखं चेतानाहीन वाटलं नंतर काही वर्ष अस्वस्थतेत गेली.

पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्या नंतर तेथील लायब्ररीत एका पुस्तकातील व्हिन्सेंट व्हॅन गॉव्हची चित्र पाहून छातीत एकदम धस्स झालेलं ते नुसतं निसर्ग चित्र नसून ते त्या चित्रकाराच्या मन: स्थितीचंच चित्रण होतं. पुढे अल्बर्ट कामूच्या एका पुस्तकातील श। स्दकेबंचम पे "जंजम व"ववसश"[५] या वाक्याचा प्रकाश संतांच्या मनावर परीणाम होवून हरवलेली चित्रकलेची वाट सापडल्यासारखी झाली. यातूनच पुढे चित्रकलेच्या क्षेत्रात रेखाटन, रंगसंगती, वातावरणनिर्मिती, रचना या सर्व घटकांचा समावेश त्यांच्या चित्रात समाविष्ट झाला. यातूनच पुढे त्यांनी निसर्गदृश्यं, उन्हाळयात भाजून निघणारा प्रदेश, सुन्या सुन्या पाऊलवाटा, असंख्य झाडं, मृत्युपंथाला लागलेली झाडं, निळेसावळे ढग, घरे अशी अनेक चित्रे प्रकाश संतांनी रेखांटलेली आहेत.

**प्रकाश संत यांची ललित लेखनातून व्यक्त झालेली सौंदर्य दृष्टी –**

प्रकाश संतांना त्यांच्या आई वडीलांन कडून मिळालेला साहित्याचा वारसा त्यांनी आपल्या लेखनीतून तसाच पुढे चालू ठेवलेला दिसून येतो. त्यांचे वडील ना.मा.संत यांच्या लघुनिबंधा प्रमाणे अधिक विकसित रूपात निखळ चैतन्यपूर्ण ललित लेखन केले आहे. प्रकाश संत यांचा 'चांदण्याचा रस्ता' हा ललित लेख ७ एप्रिल २०१३ रोजी प्रकाशीत झाला. या ललित लेखात दहा लेखांचा समावेश केला असून हे सर्वच लेख वाङ्मयीन दृष्टया अतीशय समृध्द आहेत. त्यांचे हे ललित लेखन भावनांच्या मिसळणीतून आणि अनुभवांच्या घुसळणीतून प्रकट झालेले दिसून येते. त्यांच्या ललित लेखनातून कल्पकता आणि संवेदना प्रभावी पणे व्यक्त झालेल्या दिसून येतात.

प्रकाश संत यांच्या 'टारझन सॅमसन आणि सिंड्रेला' या ललित लेखात लहान मुलांचा खेळ, त्यांची छोटी.छोटी स्वप्ने खोटी.खोटी मारामारी व लढाई असून सिंड्रेलाचे बाहुलीला मोठया माणसाप्रमाणे झोपवणे, चॉकलेटचा डबा पळवण्याचा बेत आणि ललित लेखाच्या शेवटी रडण्याचा आवाज हे सर्व प्रकाश संतांनी प्रौढत्वापणी शैशवात जपलेला कलात्मक खेळ आहे.

'पाऊस' या लेखात लेखक निसर्गाच्या सानिध्यात आपले मन रमवून निसर्गाशी आपले नाते जोडण्याचा तो प्रयत्न करीत आहेत. प्रकाश संतांनी या प्रदेशात फिरत असतांना तेथील भूमीशी, जंगलाशी आणि खाणीलगतच्या प्रदेशाशी त्यांनी आपले जिव्हाळयाचे नाते जोडून टाकलेले दिसून येते. "आता बाहेर पाऊस पडतो आहे. संध्याकाळच्या पश्चिमी उन्हाच्या सोनेरी तिरिपेत चमकत पावसाचे टपोरे थेंब वेगानं खाली येत आहेत. वरच्या पत्र्यावर होणारा तडतडाट मला किती नवखा आहे... पण तरीही हे वातावरण मला किती



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
November-2018

परिचित आहेत. हा गारवा, अंत:करणाच्या अगदी जवळ असलेली व्यक्ती भेटल्यासारखं मला वाटलं आहे. फार दिवसांनी..."[२६] अशा प्रकारे निसर्गाशी एकरूप होवून जणू ते त्यांच्याशी ऱ्हदय संवादच करत आहेत.

'ओळख' या लेखात विजेचा खांब त्यांना एखादया तपश्चर्या करणाऱ्या ऋषी सारखा वाटतो तर तोच खांब लहानपणी आपली पतंग अडकवतो त्यामुळे तो दुर्योधना प्रमाणे भासतो. रात्रीच्या अंधारामध्ये स्वत: काळोखात राहून दानशूरा प्रमाणे तो इतरांना जणू आपल्या डोक्यावरून विजेच्या तग वाहून प्रकाश देऊन जणू परोपकारच करत आहे असा भास प्रकाश संतांना होत आहेत.

'उंबरठा' या लेखात वास्तव आणि स्वप्न, जागृती आणि गाढ निद्रा यांचा जणू लेखकाच्या जीवनातील उंबरठाच आहे. आई.वडील, भांवडे यांच्या आठवणीतले क्षण आहेत. त्या अनुभवांना शब्द बध्द करण्याचा प्रयत्न केला आहेत. जीवनात आलेले दु:ख अतिशय समर्थ पणे पेलून जीवनाला सुखाच्या क्षणामध्ये परावर्तीत केले आहेत. 'हिरवा प्रकाश' या लेखात लेखकाच्या मानसिक उलघालीचा जो जिवंत अनुभव आहे तो त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहें प्रियसी व प्रियकर यांच्या मध्ये जो संवाद सुरू आहेत. त्या संवादाला जणू निसर्गातील हिरव्या प्रकाशाची साक्ष लाभलेली आहे. त्यांच्यातील तो संवाद वाचकाच्या अंत:करणाला सुखावून जातो.

'चांदण्यांचा रस्ता' हा ललित लेख वाङ्मयीन सौंदर्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या लेखात प्रकाश संत एका चांदण्या रात्री रस्त्याने जात असतांना "सर्व काही शांत, अचेतन दिसत असतानाच एका घराची दगडी भिंत त्या चांदण्याच्या प्रकाशात उजळून निघाली. त्या भिंतीवरून चांदणं द्रवरूप होऊन ओघळत आहे असं वाटलं क्षणापूर्वी अचेतन वाटणारा तो परिसर एकदम चैतन्यमय वाटायला लागला. सर्व आसमंत एखादया अमृतमय रूपेरी द्रवानं न्हाऊन निघत आहे आणि रस्त्यावरचे चांदण्याचे पट्टे म्हणजे याच अमृताच्या धारा आहेत. असं वाटलं घरांच्या रांगेतून नजर सरळ पुढे आकाशापर्यंत जाऊन पोचत होती. आकाश आणि रस्ता यामधली सीमारेषा नाहीशी झाली होती. चांदण्यानं न्हालेला रस्ता त्या आकाशाचाच एक भाग असावा असं वाटलं."[२७] यातून प्रकाश संतांच्या ठिकाणी असलेली प्रतिभाशक्ती, संवादनात्मकता, तरल भावावस्था, तीक्ष्ण अनुभवस्पर्श, तारूण्याची सळसळ, अंर्तमनातील खळखळ अशा अनेक वाङ्मयीन सौंदर्याचे प्रभावी दर्शन या ललित लेखातून होते.

'आई' या लेखात आई बद्दल असलेले प्रेम, आपूलकी, जिव्हाळा, आईने बालपणी जे संस्कार त्यांच्या बालमनावर केले त्यामूळेच प्रकाश संत जीवनाच्या प्रवाहात यशस्वी झाले आहेत. त्यांच्या आईच्या गुणांचे वर्णन करतांना म्हणतात. "घरावरून फिरणारा माझ्या आईचा हातच त्यामागं होता! त्याला आळस माहीत नव्हता आणि त्या हाताला एक सौंदर्य दृष्टी होती. त्यामुळं तो हात जिथं जिथं फिरला ते असं प्रसन्न दिसायला लागणारच."[२८] 'माझं शिक्षण' या लेखात प्रकाश संतांचे बालपण अतिशय आनंदात जात असतांना अकस्मात वडीलांच्या मृत्यु नंतर भावंडांचा अभ्यास घेण्याची जबाबदारी प्रकाश संतांवर येते. भावंडांचे पाढे पाठ करून घेत असतांना सतरा आणि एकोणीस यांचे पाढे येत नसल्याने सोळाचा पाढा सुरू झाल्यावर बाहेर जाणे व वीसचा पाढा सुरू झाल्या नंतर परत येणे. ही गोष्ट आईच्या लक्षात आल्यानंतर "शामरावप्रमाणं तू ही तुझ्या भावंडांना अभ्यासात फसवत आहेस. हे माझ्या लक्षात केव्हाच आलं आहे. तुला पाढे नीट पाठ नसतील तर अंकलिपीतून वाचून तू त्यांचा अभ्यास घे, म्हणजे तुला ही बरं वाटेल आणि त्यांचा अभ्यास व्यवस्थित होईल. शिवाय आणि मला ही किती तरी आनंद होईल. नाही तर मग ते ही काम मलाच करावं लागेल, लागू दे का?"[२९] अशा आईच्या



Scanned with CamScanner

प्रामाणिक शिकवणीने प्रकाश संतांच्या शिक्षणाला चांगले मार्ग मिळाले आहेत. त्यातूनच पुढे शिक्षण घेवून एक भूगर्भशास्त्रज्ञ, प्राध्यापक व संशोधक व लेखक म्हणून नावारूपाला आलेले आहेत.

संदर्भ ग्रंथ :–

१. प्रकाश संत (१९९४) 'वनवास', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ८७)
२. प्रकाश संत (१९९४) 'वनवास', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ७३)
३. प्रकाश संत (२००१) 'पंखा', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १५३)
४. प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १४)
५. प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १५५)
६. प्रकाश संत (२००४) 'झुंबर', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. २०)
७. प्रकाश संत (२००४) 'झुंबर', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. २०)
८. प्रकाश संत (२००४) 'झुंबर', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १००)
९. प्रकाश संत (१९९४) 'वनवास', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १४५)
१०. प्रकाश संत (१९९४) 'वनवास', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १४७)
११. प्रकाश संत (१९९४) 'वनवास', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १६७) प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ०५)
१२. प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ०६)
१३. प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १२९)
१४. प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १३१)
१५. प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १३३)
१६. प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १४०)
१७. प्रकाश संत (१९९७) 'शारदा संगीत', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. १५०)
१८. प्रकाश संत (२००१) 'पंखा', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ९०)
१९. प्रकाश संत (२००१) 'पंखा', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ९०)
२०. प्रकाश संत (२००४) 'झुंबर', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ०६)
२१. प्रकाश संत (२००४) 'झुंबर', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. २३)
२२. प्रकाश संत (२००४) 'झुंबर', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. २३)
२३. प्रकाश संत (२००४) 'झुंबर', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. २४)
२४. प्रकाश संत (२०१३)'चांदण्याचा रस्ता', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ५५)
२५. प्रकाश संत (२०१३)'चांदण्याचा रस्ता', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. २२)
२६. प्रकाश संत (२०१३)'चांदण्याचा रस्ता', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ५७)
२७. प्रकाश संत (२०१३)'चांदण्याचा रस्ता', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ८१)
२८. प्रकाश संत (२०१३)'चांदण्याचा रस्ता', मौज प्रकाशन मुंबई, (पृ.क्र. ७०)



Scanned with CamScanner